दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB | Racold | legrand | HAVELLS | LAT SWITCHGEAR | INDOASIAN | Finolex | KOLORS | USHA | PHILIPS | GreatWhite | SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर | वर्ष ३ रे | अंक २९१ वा | रविवार दि.२८ एप्रिल २०२४ | पृष्ठे ४ | स्वागत मूल्य २ रू.


# मोदींनी दहा वर्षात काय केले ते सांगावे : गांधी

उदगीर : बेरोजगारीच नव्हे तर महागाई खूप वाढली आहे. तुम्ही समाजाचा बोजा उचलता. तुम्हाला संसार सांभाळावा लागतो. तुम्ही नोकरी करता, शेती करता. समाजात किंवा कुटुंबात संकट आले तर तुम्ही त्याग करता. तुम्ही बचत केलेल्या पैशातून काही ना काही खरेदी करता. पण या सरकारने महागाई इतकी करून ठेवलीय की तुम्हाला या गोष्टी घेणेही कठिण जात असल्याचा आरोप काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे केला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे देशात सरकार आले. गेल्या दहा वर्षात या सरकारने काय केले? त्यांनी रोजगार तर दिलेच नाही, पण रोजगार घटवले आहेत. पाच किलो राशन दिले. चांगले झाले. पण या पाच किलो रेशनमध्ये तुमच्या मुलांचे भविष्य घडवले जाणार आहे का? असा सवाल काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी केला आहे. मोदींना वाटते पाच किलो राशन दिले म्हणजे सर्व काही झाले. एवढंच पुरेसे आहे. पाच किलो राशनमध्ये तुमचे काय होणार आहे? असा सवालही त्यांनी केला.प्रियंका गांधी आज लातूरच्या उदगीरमध्ये आल्या होत्या. प्रचारसभेत बोलताना त्यांनी मोदी सरकारवर जोरदार हल्ला चढवला. १२०० रुपये तुम्ही गॅस सिलिंडरला मोजत होता. निवडणूक आल्यावर मोदी म्हणाले, ४०० रुपये सिलिंडर देणार. निवडणुका पाहून त्यांनी हा निर्णय घेतला. गेल्या दहा वर्षापासून यांचं केंद्रात सरकार आहे. एवढ्या वर्षात गॅस महागडा केला. आता कमी केला. याचा अर्थ काय? तुम्हाला बेरोजगार ठेवले आणि पाच किलोचे राशन देण्याची मेहरबानी केली. शेतकरी आत्महत्या करत आहे. सोयाबीनच्या शेतक-यांची परिस्थिती खालावली आहे असे प्रियंका गांधी म्हणाल्या. दहा वर्षात रोजगार बंद गेल्या दहा वर्षात यांनी रोजगार बंद केले. चुटकी वाजवून काय केले? रोजगार निर्माण केले नाही. महागाई कमी केली नाही. महिलांसाठी काहीच केलं नाही. जिथे जिथे काँग्रेसचे सरकार आहे. तिथे महिलांना



पैसे दिले जात आहे. कर्नाटकात गरीब कुटुंबातील महिलांना दोन हजार रुपये मिळत आहेत, असे प्रियंका गांधी यांनी सांगितले.७० लाख पदे रिक्त काँग्रेसने या ठिकाणी खूप विकास केला. मोठ्या फॅक्ट्री तयार झाल्या त्या केवळ काँग्रेसमुळे. तुमच्याशी मला गंभीर गोष्टी बोलायच्या आहेत. तुम्ही गांभीर्याने विचार करा. आपला देश कुठे आहे हे पाहा. आज देशात सर्वाधिक बेरोजगारी आहे. ४५ वर्षात नव्हती एवढी बेरोजगारी आहे. केंद्रात ३० लाख पद खाली आहे. पण भरले नाही. ७० लाख लोक बेरोजगार आहे. तुमच्या आयुष्यात तुम्ही अनेक समस्यांचा सामना केला आहे. मोदी सरकार पद भरत नाही, असा आरोप त्यांनी केला.१५ लाख खात्यात आले का? मोदी सरकारने अब्जाधीशांना १६ लाख कोटी रुपयांची कर्ज माफी दिली. शेतक-यांना काय केले? या देशातील शेतक-यांना जीएसटी दिली. शेतकरी दिल्ली आंदोलनात मेले. ६०० शेतकरी मेले, पण मोदी घराच्या बाहेर आले नाही. निवडणुका आल्यावर नौटंकी सुरू होते. मोठमोठी आश्वासन दिले जातात. कुणाच्या खात्यात आले १५ लाख सांगा? असा सवाल त्यांनी केला.

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संभाव्य दौऱ्यानिमित्त ३० एप्रिल रोजी जिल्ह्यातील वाहतूक मार्गात बदल

लातूर, दि. २७ : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा ३० एप्रिल, २०२४ रोजी लातूर जिल्हा दौरा प्रस्तावित आहे. या दौऱ्यादरम्यान लातूर येथील गरुड चौकाच्या बाजूस बिर्ले फार्म येथील प्रधानमंत्री यांच्या सभास्थळाकडे जाणाऱ्या वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे. सभास्थळाकडे येणारी जड व मालवाहू वाहने व इतर सर्व प्रकारच्या वाहनांस ३० एप्रिल, २०२४ रोजी दुपारी १२ ते ५ वाजेपर्यंत प्रतिबंध करून पर्यायी मार्गाचा वापर करण्याबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) नुसार आदेश निर्गमित केले आहेत.

असे असतील वाहतूक मार्गातील बदल नांदेड रोड व उदगीर रोडकडून लातूरकडे येणारे जड व मालवाहतूक करणारी मोठी वाहने आष्टामोडपासून पुढे येण्यासाठी मनाई राहील. सोलापूर, तुळजापूरकडून लातूरकडे येणारी जड व मालवाहतूक करणारी मोठी वाहने औसा येथील तुळजापूर टी-पॉईटपासून पुढे लातूरकडे आणण्यास मनाई राहील. कृषि महाविद्यालय, डी-मार्ट, रिंगरोडकडून येणारी चारचाकी, तीनचाकी व दुचाकी या सर्व प्रकारच्या वाहनांसाठी गरुड चौक ते बाभळगाव नाका हा रोड वाहतूकीस बंद राहील. महात्मा बसवेश्वर चौक, बाभळगावकडून येणारी चारचाकी, तीनचाकी व दुचाकी या सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बाभळगांव नाका ते गरुड चौक हा रोड वाहतुकीस बंद राहील.


बंद केलेले मार्गावरील वाहनांसाठी पर्यायी व्यवस्था नांदेड रोड व उदगीर रोडकडून येणारी जड व माल वाहूतक करणारी मोठी वाहने लातूरमार्गे तुळजापूर व सोलापूर जाण्याऐवजी आष्टामोड येथून नळेगाव-निटूर-निलंगा-लामजाना-औसामार्गे जातील. तसेच नांदेड रोड व उदगीर रोडकडून येणारी जड व माल वाहतूक करणारी मोठी वाहने लातूरमार्गे जाण्याऐवजी अंबाजोगाई, बीड जाण्यासाठी आष्टामोड येथून खरोळा-रेणापूरमार्गे जातील. तसेच नांदेड रोड व उदगीररोडकडून लातूर एमआयडीसी येथे येणारी जड व माल वाहूतक करणारी मोठी वाहने आष्टामोड येथून खरोळा-रेणापूर-महापूर-नवीन रेणापूर नाकामार्गे लातूर एमआयडीसी येथे जातील. सोलापूर , तुळजापूरकडून लातूरमार्गे नांदेडकडे जाणारी जड व मालवाहतूक करणारी मोठी वाहने औसा येथून तुळजापूर टी-पॉईटपासून लामजाना -निलंगा-निटूर-नळेगाव-आष्टामोडमार्गे जातील. तसेच अंबाजोगाई, बीडकडून येणारी जड व माल वाहतूक करणारी मोठी वाहने लातूरमार्गे जाण्याऐवजी नांदेडकडे जाण्यासाठी रेणापूर-खरोळा-आष्टामोडमार्गे जातील.

## देशात 'भाजप'साठी परिस्थिती प्रतिकूल, पंतप्रधान पदाचा चेहरा बदलेल?- ॲड. प्रकाश आंबेडकर

देशभरात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. देशभरातील काही मतदारसंघात दोन टप्प्यांतील मतदानाची प्रक्रिया पार पडली आहे. पुढे १ जूनपर्यंत आणखी ५ टप्प्यांत देशात निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर महायुती आणि इंडिया आघाडीच्या नेत्यांच्या प्रचार सभांचा धडाका सुरु आहे. दरम्यान, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी 'देशभरात भाजपसाठी परिस्थिती पोषक नसून, पंतप्रधान पदाचा चेहरा बदलू शकतो', असे भाकीत केले आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने दिले आहे.

वंचितचे ड. प्रकाश आंबेडकर यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले आहे की, पं. बंगाल ममता बॅनर्जी यांच्याकडे आहे. बिहारमध्येदेखील जनतेचा मूड नितीशकुमारांच्या विरोधात आहे. उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातदेखील काही गोष्टी भाजपच्या बाजूने नाहीत, असेही ते म्हणाले.

भाजपसाठी परिस्थिती प्रतिकूल नाही, मी आधीच सांगितले आहे की, भाजपला ४०० पारचे लक्ष्य गाठता येणार नाही. जे खरे विश्लेषण करतात त्यांनी भाजपला



२०० च्या वर कधीच जागा दिल्या नाहीत. सत्ता बाजारात भाजपच्या जागा कमी होताना दिसत आहेत, त्याचे काही हे संकेत आहेत, असेही आंबेडकर यांनी म्हटले आहे. लोकसभा निवडणुकीनंतर सरकार कोण स्थापन करेल? हे सांगणे कठीण आहे. ते पक्षातील नेत्यांवर अवलंबून असेल. कारण ते स्वतः ला वाचवण्याचा प्रयत्न करतील. पण आगामी लोकसभेच्या पंतप्रधानांचा चेहरा बदलण्याची शक्यता आहे. काँग्रेस मुस्लिमांना तिकीट देणार नाही. असेदेखील आम्ही गेल्या काही काळापासून म्हणत असल्याचेही ड. प्रकाश आंबेडकर यांनी एएनआयशी बोलताना स्पष्ट केले आहे.

# घराणेशाहीचे राजकारण संपुष्टात आणण्यासाठी महायुतीलाच बहुमताने विजयी करण्याची गरज

## चिंचोली ब. येथील प्रचंड जाहीर सभेत शिवसेनेचे ॲड. बळवंत जाधव यांचे आव्हान








लातूर :- संविधान बचाव ची भाषा करणाऱ्या काँग्रेसने आयुष्यभर संविधान पायदळी तुडवले असून लातूरसह देशभरात काँग्रेस आघाडीच्या पुढार्यांचे सुरू असलेले घराणेशाहीचे राजकारण संपुष्टात आणण्यासाठी लोकसभा निवडणुकीत भाजपा महायुतीलाच प्रचंड मताधिक्याने विजयी करावे ही काळाची गरज आहे असे आवाहन शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख ॲड. बळवंत जाधव यांनी लातूर तालुक्यातील मौजे चिंचोली बल्लाळनाथ येथील महायुतीच्या जाहीर सभेत बोलताना केले.

लातूर लोकसभा निवडणुकीतील भाजपा महायुतीच्या प्रचारार्थ लातूर तालुक्यातील मौजे चिंचोली ब. येथे शनिवारी रात्री चिंचोली, काटगाव, निवळी जिल्हा परिषद मतदार संघाची जाहीर सभा झाली. या सभेस महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे, भाजपा नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, शिवसेनेचे बळवंत जाधव, भाजपा युवा नेते ऋषिकेशदादा कराड, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव भागवत सोट, जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, शिवसेनेचे जिल्हा युवा प्रमुख कुलदीप सूर्यवंशी, तालुकाप्रमुख राजकुमार सुरवसे, भाजपाचे तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, दशरथ सरवदे संगायो समितीचे अध्यक्ष वैभव सापसोड, सुरज शिंदे, विश्वास कावळे, काशिनाथ ढगे, संभाजी वायाळ, गोपाळ पाटील, महिला आघाडीच्या सुरेखा पुरी, अनुसया फड, जनाबाई साखरे, पांडुरंग गडदे, धनराज शिंदे. भैरवनाथ पिसाळ. विकास शिंदे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती

संविधान बचाव म्हणणाऱ्या काँग्रेसच्या इंदिरा गांधींनी आणीबाणी लागू करून जनतेचे अधिकार काढून घेतले आणि संविधान पायदळी तुडवले असल्याचे सांगून शिवसेनेचे बळवंत जाधव म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात झालेल्या आंदोलनाला सर्वांनी पाठींबा दिला. यापूर्वी आरक्षण दिले होते मात्र हायकोर्टाने रद्द केले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील राज्य शासनाने अभ्यास करून त्रुटी बाजूला काढून दहा टक्के आरक्षण दिले, या आरक्षणाला मागितलेली स्थगिती हायकोर्टाने दिली नाही याचाच अर्थ टिकणारे आरक्षण दिले आहे तेव्हा कोणाच्याही अपप्रचाराला मराठा समाजाने बळी पडू नये असे बोलून दाखविले.

गेल्या विधानसभा निवडणुकीत देशमुखांनी सौदा करून उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेची गद्दारी केली. सचिन देशमुख कुठून आला होता हे जाहीर करावे, मोदीजींचा फोटो लावायचा निवडून यायचे आणि पवाराशी सोयरीक करायची, खरे उत्तर उद्धव ठाकरेच आहेत. बाळासाहेबांचे विचार राबवणारे एकनाथ शिंदे हेच खरे शिवसैनिक आहेत असे सांगून बळवंत जाधव म्हणाले की, देशमुख बंधुंनी शेतकऱ्यांसाठी कारखाने काढले मात्र चारही कारखान्याचे चेअरमन पद घरातच घेतले घराणेशाही चालवणाऱ्यांना लोकशाहीची भाषा शोभत नाही.

यावेळी बोलताना महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांनी लातूर लोकसभा मतदारसंघात गेल्या पाच वर्षात केलेल्या विविध विकास कामाचा आढावा देऊन देशाला विश्व गुरु करण्यासाठी आणि मतदार संघाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी नरेंद्रजी मोदी साहेब यांनाच समर्थन द्यावे, आपली सेवा करण्याची संधी पुन्हा एकदा मला द्यावी असे आवाहन केले.

महिलांच्या अडीअडचणी समजून घेऊन सोडविण्याचा प्रयत्न करणारे नरेंद्रजी मोदी यांनी महिलांसाठी सुरू केलेल्या विविध योजनांची माहिती देऊन डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाले की, निवडणुकीच्या काळात विरोधकाकडून अपप्रचार केला जातो अशा अपप्रचाराला बळी न पडता देश हित डोळ्यासमोर ठेवून गेल्या पाच वर्षात मतदारसंघात झालेल्या कामाची जाणीव ठेवून सुधाकर शृंगारे यांना प्रचंड बहुमताने विजयी करून नरेंद्रजी मोदी यांना आशीर्वाद द्यावेत असे आवाहन केले.

या सभेत भाजपाचे युवा नेते ऋषिकेश दादा कराड यांचे अत्यंत जोशपूर्ण आणि अभ्यासपूर्ण भाषण झाले यावेळी बोलताना म्हणाले की, लोकसभेची निवडणूक ही देशाला बळकट आणि खंबीर नेतृत्व देण्यासाठी महत्त्वाची असून नीती, नियत आणि नेता हे तीन मुद्दे अत्यंत महत्त्वाचे असून भाजपा महायुतीची नीती स्पष्ट आहे नियत साफ आहे आणि नेता जगाला दिशा देणारा आहे, मात्र काँग्रेस आघाडीकडे निती-नियत सर्व काही परिवार वाद आहे नेता अद्याप निश्चित नाही नेत्याबाबत ज्यांचे एकमत होऊ शकत नाही ते काय करू शकतात असा प्रश्न उपस्थित करून पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी गेल्या दहा वर्षात केलेल्या विविध विकास कामाचा आढावा दिला.

शासन पाणी आडवा आणि पाणी जिरवा हे अभियान राबवत आहे मात्र आपल्या भागात देशमुखा कडून माणसं आडवा आणि जिरवा हा कार्यक्रम वर्षानुवर्ष सुरू आहे. कार्यक्षेत्रातला ऊस वगळून गेटकेनचा आणायचा, भावात पाप, वजनात पाप असल्याचे सांगून मांजराच्या दारात आ. रमेशआप्पा कराड यांनी आंदोलन केल्यामुळेच शेतकऱ्यांना एफआरपीप्रमाणे भाव मिळू लागला अशी माहिती ऋषिकेश कराड यांनी दिली. देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी तुमच्या आमच्या हितासाठी विकासासाठी भाजपा महायुतीच्या कमळ चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने विजयी करा असे आवाहन केले.

प्रारंभी शिवसेना तालुकाप्रमुख राजकुमार सूर्यवंशी यांनी प्रास्ताविक केले, यावेळी बालाजी दुटाळ, गोपाळ सोट, प्रशांत शिंदे, गोविंद नांदे, गुरुनाथ काळे, अमर शिंदे, शिवाजी अडसूळ, योगीराज साखरे, बाबा भिसे, बालाजी नाईकवाडे, भाऊसाहेब भिसे, शंकर चव्हाण, हनुमंत जाधव, श्रीकांत झाडके, अल्ताफ शेख, शरद शिंदे, शहाजी शिंदे, हनुमंत पाटील, विश्वास शिंदे, यांच्यासह भाजपा व मित्र पक्ष महायुतीतील कार्यकर्ते पदाधिकारी लोकप्रतिनिधी मतदार बंधू भगिनी हजारोच्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय....

# कायदे शिक्षणात सुधारणांची गरज

कायद्याचे शिक्षण हे देशाच्या संपूर्ण व्यवस्थेचा कणा आहे. आजघडीला देशात विधी महाविद्यालयांची संख्या १८०० पेक्षा अधिक आहे आणि त्यांपैकी सुमारे १२०० महाविद्यालये खासगी क्षेत्रात, ५०० पेक्षा अधिक कॉलेज सरकारी क्षेत्रात आणि सुमारे शंभर कॉलेज अनुदानित आहेत. अर्थात, भारताच्या उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेविषयी आणि मूलभूत निकषांविषयी राष्ट्रीय पातळीवर नेहमीच चर्चा झाली आहे. शिक्षणाच्या मूलभूत घटकांचे पालन केले जात नसल्याचे सांगितले जाते.देशात कायद्याचे शिक्षण धोरण निश्चित करणारी सर्वोच्च संस्था बार कौन्सिल ऑफ इंडियाने सर्वच राज्य सरकारांना आणि विद्यापीठांच्या कुलगुरूंना पत्र लिहून विधी शिक्षणाचा मांडला जाणारा बाजार आणि विस्तारावर चिंता व्यक्त केली. बार कौन्सिलने देशात विधी शिक्षणाच्या बाजारावर अंकुश ठेवण्याची विनंती केल्याने या प्रश्नाकडे सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. गेल्या काही वर्षांत राज्य सरकारांनी ३०० नवीन विधी महाविद्यालये सुरू करण्यास परवानगी दिली. या महाविद्यालयांना परवानगी देताना गुणात्मकता आणि दर्जा यांचा विचार झालेला दिसत नाही. कायद्याचे शिक्षण हे देशाच्या संपूर्ण व्यवस्थेचा कणा आहे. भारताच्या उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेविषयी आणि मूलभूत निकषांविषयी राष्ट्रीय पातळीवर नेहमीच चर्चा झाली आहे.शिक्षणाच्या मूलभूत घटकांचे पालन केले जात नसल्याचे सांगितले जाते; मात्र कायद्याच्या शिक्षणाचा दर्जा एवढा ढासळला आहे की, त्याने सर्वच मर्यादा ओलांडल्या. आजघडीला सर्वच क्षेत्रांत गुणात्मक घसरण आणि उणिवा प्रकर्षाने जाणवत आहेत आणि यामागचे मूळ कारण म्हणजे सक्षम विधी शिक्षण व्यवस्था नसणे. बार कौन्सिलचे नवे प्रयत्न साकार होत असतील तर त्याचा सकारात्मक परिणाम देशातील सर्वच क्षेत्रांवर पडेल. आज कोणतेही शहर पाहा, वकिलांच्या शोचनीय स्थितीची अनेकदा टवाळी केली जाते. या गोष्टी टाळण्यासाठी कायद्याच्या अभ्यासक्रमाला आणि शिक्षणाला अधिक प्राधान्य देण्याची गरज आहे. कायद्याचे शिक्षण हे प्रजासत्ताक, संसदीय व्यवस्था, घटना, नागरिकांचे मूलभूत हक्क, स्वतंत्र, मताचा अधिकार अबाधित राखणे आणि सर्व प्रकारच्या भेदभावांवर घटनात्मक उपाय म्हणून पाहू शकतो.महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, राजेंद्र प्रसाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार वल्लभभाई पटेल, मदन मोहन मालवीय, मोतीलाल नेहरू, बाळ गंगाधर टिळक, लाला लजपतराय आणि सी. राजगोपालचारी यासारख्या राष्ट्रीय नेत्यांनी उच्च दर्जाचे कायद्याचे शिक्षण घेतले आणि ते वकिली व्यवसायात होते. आजच्या काळातील कायद्याचे दर्जाहीन शिक्षण आत्मसात करत वकील होणारी मंडळी घटनात्मक व्यवस्थेची योग्यरीत्या देखभाल आणि कायद्याच्या राज्याची योग्य व्याख्या करू शकतील काय? म्हणून बार कौन्सिलच्या चिंतेचे महत्त्व कळून चुकते. इंजिनिअरिंगमध्ये आयआयटी, व्यवस्थापनात आयआयएम आणि वैद्यकीय शिक्षणातील एम्स याप्रमाणे कायद्याच्या शिक्षणात उच्च दर्जा प्रस्थापित करण्यासाठी १९९० च्या दशकात नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी स्थापन करण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रीय विधी महाविद्यालयांची संख्या आता २७ झाली आहे. त्यांची स्थापना सरकारच्या व्यवस्थेमार्फत करण्यात आली.या महाविद्यालयांतून बाहेर पडणारे विद्यार्थी आज चमकणारे तारे झाले आहेत. या संस्थेतील पदवीधरांना देश-विदेशात मागणी वाढत आहे. त्यांचा नावलौकिक होण्याचे प्रमुख कारण म्हणजे तीन वर्षांच्या अभ्यासक्रमाची कायद्याची पदवी न घेता पाच वर्षांचा एकात्मिक अभ्यासक्रम (इंटिग्रेटेड कोर्स) पूर्ण करणे. या राष्ट्रीय संस्थांसारखी गुणवत्ता ही देशातील सर्व १८०० विधी महाविद्यालयांना बहाल करता येऊ शकते का? भारताचे इंजिनिअर, डॉक्टर, व्यवस्थापकांना जगभरात मागणी वाढली आहे. यानुसार कायदेपंडितांनादेखील मागणी व्हायला हवी. आगामी काळात जागतिक पातळीवर आपल्या हक्काची लढाई करण्यासाठी निष्णात लाखो वकिलांची गरज भासणार आहे.

# अवकाशातील शक्तिप्रदर्शन

स्टार वॉर ही जुनी कल्पना आहे; मात्र त्यादृष्टीने होणार्या प्रयत्नांच्या बातम्या नेहमीच येत राहतात. रशिया आणि अमेरिका यांच्यात १९६०-७० च्या दशकांत अवकाश विज्ञानाच्या आघाडीवर स्पर्धा सुरू झाली आणि या स्पर्धेत मानव हा चंद्रावर पाऊल टाकण्यात यशस्वी ठरला. आता स्पर्धा संपली आणि अवकाश विज्ञान हळूहळू उपग्रहांपर्यंत मर्यादित होत गेले. प्रत्यक्षात अवकाशात शक्तिप्रदर्शन करण्याची स्पर्धा अजूनही संपलेली नाही. या दिशेने सध्याच्या बातम्या चिंताजनक आहेत.चीनचा अवकाश कार्यक्रम हा लष्करी योजनांचा भाग असल्याचे म्हटले जात आहे. अमेरिकी हा आश्चर्यकारक वाटणारा नाही. चीन हा कोणतीही योजना युद्धपातळीवर तयार करतो आणि लागू करतो. मग खेळ असो, उत्पादन असो किंवा तंत्रज्ञान असो, तो प्रत्येक प्रयत्न हा सामरिक हेतूनेच करत असतो. वास्तविक अमेरिकेनेदेखील दीर्घकाळापर्यंत याच रणनीतीवर काम केले आहे. त्यामुळे चीनला रोखण्यासाठी आता अमेरिकेकडे काय योजना आहे, हा प्रश्न आहे. अमेरिकेकडे चीनच्या अवकाश मोहिमांबद्दल ठोस माहिती आहे का? चीनकडून अवकाशात शस्त्रसज्जता केली जात असतील तर त्याचे काही पुरावे आहेत का? असतील ते सार्वजनिक करणे आवश्यक आहे; परंतु तो स्वत: जबाबदार आहे. अमेरिकेने आपला बराच काळ संशोधन संस्थांसह जगभरातील हुकूमशहा, दहशतवादी संघटना, इराक, अफगाणिस्तान आणि अरब जगावर खर्च केला. या काळात चीनने तंत्रज्ञान आणि विज्ञानावर लक्ष केंद्रित केले. यावरून 'नासा'ची अस्वस्थता लक्षात येते. चीनने २०२२ मध्ये पृथ्वीला प्रदक्षिणा घालणारे वेगळे अवकाश केंद्र स्थापन केले.या स्थानकाबाबत जगाला फारशी माहिती नाही आणि ही सर्वात धोकादायक बाब आहे. अमेरिका किंवा 'नासा'ला ही गोष्ट लक्षात आली तर तो कोठून सुरुवात करेल, हा प्रश्न आहे. लक्षात ठेवा, चीनच्या तंत्रज्ञान



अवकाश संशोधन केंद्र नासाच्या प्रमुखाने दिलेल्या इशार्यानुसार चीन आपला सामरिक उद्देश लपविण्यासाठी बहुउद्देशीय अवकाश कार्यक्रमाचा वापर करत आहे. अशावेळी अमेरिकेने सजग राहणे गरजेचे आहे. नासाचे प्रशासक बिल नेल्सन यांनी कॅपिटॉल हिल येथे खासदारांना चीनच्या अवकाश कार्यक्रमाच्या प्रगतीची माहिती दिली. गेल्या दहा वर्षांत चीनने लक्षणीय प्रगती केली असून, त्याचा उद्देश अजूनही गुप्त आहे, असे म्हटले जात आहे. एकुणातच चीनसंदर्भात अमेरिकेला महत्त्वाची माहिती हाती लागल्याचे दिसते. त्यामुळेच नासाने अजूनही अवकाशात स्पर्धा सुरू आहे, असे स्पष्ट शब्दांत सांगितले.चीनवरील अमेरिकेचा असणारा अविश्वास अमेरिकेची आगामी योजना पाहिली, तर त्यातून फारसे समाधान होत नाही. कारण, 'नासा'ला बायडेन सरकारकडून मोठे बजेट हवे आहे. त्यामुळे त्यांच्या प्रमुखांनी अमेरिकी संसदीय समितीसमोर चीनसंदर्भातील इशारा दिला आहे. चीन हा अमेरिकेच्या अगोदर चंद्रावर पोहोचला, तर तो अन्य देशांना तेथे पोचू देणार नाही, अशी भिती अमेरिकेला वाटत आहे का? याचा अर्थ 'नासा'ला जादा बजेट हवे आहे आणि त्यानुसार लवकरात लवकर चांद्रमोहीम आखता येणे शक्य राहील.प्रत्यक्षात चंद्रावर अमेरिकेची उपस्थिती सक्षम आहे आणि चीनच्या चांद्रमोहिमेला अद्याप वेळ लागणार आहे; परंतु अमेरिकेची पकड ही निश्चित सैल झाली आहे आणि यासाठी विकासात अमेरिकेचे सर्वाधिक योगदान राहिले आहे आणि अजूनही त्याचे चीनबाबतचे धोरण स्पष्ट नाही. अमेरिकेकडे अन्य कोणताही मार्ग नाही. त्याला अवकाशात आपली जागतिक आघाडी राखावी लागणार आहे. चीन हा अत्यंत कुरापोतखोर देश आहे. त्यामुळे भारतानेही अवकाश योजनांबाबत सावध राहावे लागेल. चीनच्या सर्व मोहिमा या लष्करी सामर्थ्य वाढवण्यासाठी केल्या जातात. महासत्ता होण्याच्या महत्त्वाकांक्षेने चीन पछाडलेला आहे; त्यामुळे त्याच्या सर्व हालचालींत अत्यंत बारकाईने लक्ष घालण्याची गरज आहे.

# रेपो दर स्थिर ठेवण्याची कारणमीमांसा

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा बैठकीत चलनवाढीशी संबंधित चिंतेमुळे रेपो दरामध्ये कोणताही बदल केला गेला नाही. चलनवाढीवरून आरबीआयची चिंता योग्य आहे. अमेरिकेतील फेडरल रिझर्व्ह बँकही याच महागाईमुळे चिंतेत असल्याने त्यांनी व्याजदर कपातीचे डिसेंबरमध्ये दिलेले आश्वासन अद्याप अमलात आणलेले दिसत नाहीये. अमेरिकेचा बाजार हा भारतापेक्षा चांगला आहे, असे वाटत असेल तर गुंतवणूकदार भारतीय बाजारातून पैसा काढून अमेरिकेत गुंतवणूक करतील. या कारणांमुळेही आरबीआयला फेडरलच्या दरानुसार दर निश्चित करावे लागत आहेत.रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा बैठकीत चलनवाढीशी संबंधित चिंतेमुळे रेपो दरामध्ये (६.५ टक्के) काही बदल केला नाही. आरबीआयच्या मते, नीचांकी चलनवाढीचे ध्येय गाठण्यासाठी व्याजदर 'जैसे थे' ठेवणे गरजेचे होते. मूल्याला स्थिरता आल्यास अर्थव्यवस्थेला गती मिळू शकते, असे आरबीआयला वाटते. अर्थात, आरबीआयकडून अशाच निर्णयाची अपेक्षा होती. देशांतर्गत पातळीवर बिगर खाद्य आणि इंधनेतर वस्तूंच्या चलनवाढीत एक ते दीड वर्षापासून फारसा बदल झाला नाही आणि वाढ झालेली नाही. काही वस्तूंतील महागाई दरदेखील कमी झाला आहे; मात्र खाद्यान्नाचा महागाई दर कमी होताना दिसून येत नाही. या महागाई दराला भाजीपाला हा सर्वाधिक कारणीभूत आहे. गेल्या वर्षी लहरी हवामानामुळे शेतीच्या उत्पादनावर नकारात्मक प्रभाव झाला. त्यामुळे महागाईत वाढ होणे स्वाभाविक होते. या वर्षी पाऊस सामान्य राहण्याचा अंदाज आहे; मात्र उष्णतेची लाट आणि उष्मा याची शक्यता वर्तविली जात आहे. असे घडले तर काही पिकांवर त्याचा निश्चितच परिणाम होऊ शकेल. अशा स्थितीत आरबीआयने 'थांबा आणि पाहा' असा निर्णय घेतला आहे.दुसरी बाजू म्हणजे तेलाच्या किमतींबाबतची अनिश्चितता. पश्चिम आशियातील संकट अजून टळलेले नाही आणि ते कधीही कोणतेही रूप धारण करू शकते. अजूनही कच्च्या तेलाच्या किमती वाढण्याचा ट्रेंड दिसून येत आहे. लाल समुद्रातील सागरी मार्ग विस्कळीत झाल्याने पुरवठा साखळी बिघडण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात तेल महाग झाले, तर आपला आयात खर्चदेखील वाढेल आणि देशांतर्गत बाजारातील किमतीदेखील वाढतील. या स्थितीवरदेखील आरबीआयने लक्ष ठेवले आहे. गेल्या वर्षी अमेरिका आणि युरोपच्या बाजारात मागणी वाढली; मात्र जागतिक मागणीच्या बाबतीत चीनकडे एक महत्त्वाची अर्थव्यवस्था म्हणून पाहता येईल. गेल्या वर्षी मागणीत घट दिसून आली आणि त्यामुळे पोलाद, खनिज, सिमेंट, लोखंड, तेल आदींच्या किमती स्थिरावल्या किंवा कमी झाल्या; परंतु ही स्थिती नेहमीच नसते. चीनच्या खरेदीत सुधारणा झाली, तर चलनवाढीवर परिणाम होईल. सध्या चीनच्या विकासाचे आकडे पाहिले, तर ते अंदाजापेक्षा अधिक आहेत. त्यामुळे ही स्थिती राहिली, तर चीनकडून मागणीत वाढ होईल. भारतासह अनेक देशांतील केंद्रीय बँकांना आजच्या काळात चलनवाढ नियंत्रित ठेवणे महत्त्वाचे झाले आहे. चढे व्याजदर ठेवण्याचे कारण म्हणजे उद्योग असो, कुटुंब




असो किंवा व्यक्ती असो, ते जादा व्याजदरामुळे कर्ज कमी घेतील आणि त्यामुळे बाजारात अपेक्षेपेक्षा कमी पैसा येईल व त्याच्या किमती आपोआप कमी राहतील. अर्थात, या विचारांवर टीका करणारेदेखील आहेत; परंतु आरबीआय याच दृष्टिकोनातून काम करत आहे.आपल्या देशात कायदेशीररीत्या चार टक्के ते दोन टक्के यादरम्यान किंवा कमी राहण्याच्या स्थितीला नियंत्रित चलनवाढ असल्याचे मानले जाते. या हिशेबाने त्याला चार टक्क्यांच्या पातळीपर्यंत आणायचे आहे आणि ते काम आजपर्यंत झालेले नाही. अमेरिकेत चलनवाढ नियंत्रित झाली तरी अर्थव्यवस्थेवर त्याचा विशेष परिणाम होणार नाही, असा अंदाज बांधला जात होता; परंतु असे घडले नाही. यामागचे कारण म्हणजे चलनवाढ ही एका योग्य पातळीवर स्थिरावलेली आहे. भारतातदेखील असेच घडले आहे. चलनवाढीत काही प्रमाणात घट झाली; परंतु ती चार टक्क्यांपेक्षा अधिक आहे. विशेष म्हणजे विविध कारणांनी जगभरातील केंद्रीय बँका अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह बँकेचे अनुकरण करतात. अमेरिकेतही व्याजदरात कपात झालेली नाही. फेडरल आणि रिझर्व्ह या दोन्ही बँकांच्या व्याजदरात फरक पडतो, तेव्हा या आधारावर गुंतवणूकदार पैसे जमा करण्याचा निर्णय घेतात. अमेरिकेचा बाजार हा भारतापेक्षा चांगला आहे, असे जर वाटत असेल तर ते बाजारातून पैसा काढून अमेरिकेत गुंतवणूक करतील आणि तेथे त्यांना चांगला फायदा होईल. अशावेळी गुंतवणूकदार प्रामुख्याने शेअर बाजार, रोखे, बाँड, मनी मार्केटमध्ये पैसे टाकतात. या कारणांमुळेदेखील आरबीआयला 'फेडरल'च्या दरानुसार आपले दर निश्चित करावे लागतात.आरबीआयच्या पतधोरण समितीचे सदस्य प्राध्यापक जयंत वर्मा यांनी रेपो दर कमी करण्याच्या बाजूने मतदान केले. त्यांच्या मते, चलनवाढीवरून प्रत्यक्षात गंभीर स्थिती आहे असे वाटत नाही. त्यामुळे काही प्रमाणात कपात करायला हवी. तसेच जादा व्याजदरामुळे अधिक वृद्धीवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो, असेही त्यांनी म्हटले आहे. तूर्त पतधोरण समितीने येत्या काही महिन्यांत यात बदल न करण्याचा निर्णय घेतला आहे. समितीची पुढची बैठक पाच ते सात जून रोजी होणार आहे. यानुसार ऑक्टोबर महिन्यातच ठोस निर्णय होईल, असे दिसते. तोपर्यंत पावसाचे आकलन होईल आणि पश्चिम आशियातील स्थितीही सामान्य होईल; परंतु आताच खाद्य आणि तेलाच्या चलनवाढीवरून निश्चित सांगता येत नाही. चलनवाढीवरून आरबीआयची चिंता योग्य आहे. त्याचबरोबर कोणतीही कपात ही अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह बँकेच्या भूमिकेवर अवलंबून राहील.

# भारतातील नामांकित समजल्या जाणाऱ्या (यूपीएससी) णझडऊ सिव्हील सर्व्हिसेस या परीक्षेत पूर्ण देशात १२६ वा क्रमांक पटकावून विवेक विश्वनाथ सोनवणे याची उतुंग भरारी

नवी मुंबई / के.एच. हनवते :– सध्या बेलापूर सीबीडी स्थित असलेले सोनवणे कुटुंब हे मूळचे जळगाव जिल्हा तील पिंपळगाव चौखांबे गावचे आहेत. वडिलांच्या नोकरी निम्मित ते रोहा, कल्याण व नवी मुंबईला, खारघर ला आले. विवेक चे प्रथमिक शिक्षण मेहंदळे हायस्कूल रोहा येथे तर चौथी ते दहावी बालकमंदिर ( कॅप्टन ओक ) स्कूल मद्ये झाले तर अकरावी बारावी सेंट जोसेफ स्कूल कळंबोली येथे झाले. त्याचे वडील विजकेंद्रात इंजिनियर पदावर तर आई गृहिणी आहेत. मोठी बहीण कॅनडा येथे एम एस करत आहे. तिचा त्याला खूप पाठिंबा आहे.

विवेक विश्वनाथ सोनवणे यांची मागच्या वर्षी २०23 मध्ये श्रझड (आयपीएस) मध्ये निवड झाली. ओडिसा हे राज्य त्याला मिळाले होते. पण विवेक चे स्वप्न खत्रझ (आयएफएस) चे इंडीयन फॉरेन सर्व्हिसेस मद्ये जगाच्या पातळीवर आपल्या देशासाठी नेतृत्व करायचे होते. त्यामुळे अथक मेहनत करायची त्याने सोडले नाही आणि आपले ध्येय गाठले. इंजिनिअर ची पदवी भारतातील पहिल्या क्रमांकाचे कॉलेज खखढ (आयआयटी) पवई मुंबई येथून केले. पुढे केमिकल विषय घेऊन आय आय टी तुन पदवी सनं पादन केली. ींलि यूपीएससी परीक्षेसाठी कुठेही क्लास लावला नाही. घरीच अभ्यास करून स्वतः च स्वतः चा मार्गदर्शन बनला. व स्वबळावर संपूर्ण भारतातून १२६ असा रँक मिळवून भरारी घेतली. या उत्तुंग यशासाठी विवेक चे सर्वत्र कौतुक होत आहे. आणि मार्गदर्शन



करायला त्याला व त्याच्या परिवाराला बोलावले जात आहे. अनेक ठिकाणी त्याचा सत्कार केला जात आहे. मनात आणले तर आपण आपले ध्येय गाठू शकतो असा आदर्श विवेक ने सर्व तरुणांना पुढे ठेवला आहे. त्याग, परिश्रम मेहनत याची जोड मात्र नक्की हवी. निराशा आली तेव्हा पाठिंबा देणारे आईवडील बहीण हवी. पुढच्या वाटचालीस विवेक ला मंगलमय हार्दिक शुभेच्छा..! शुभेच्छुक – मॅनेजिंग डायरेक्टर संजय सुरवाडे आणि भारतीय बौद्ध महासभा सिवुड शाखा अध्यक्ष : संजय झनके (गुरूजी) यांनी दिल्या.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यामुळे ३० एप्रिल रोजी ड्रोन वापरावर बंदी

लातूर, दि. २७ : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा ३० एप्रिल, २०२४ रोजी लातूर जिल्हा दौरा प्रस्तावित आहे. या दौऱ्याच्या अनुषंगाने जिल्ह्याच्या हद्दीमध्ये २७ एप्रिल २०२४ ते ३० एप्रिल २०२४ रोजी २४.०० वाजेपर्यंत विना परवाना व बेकायदेशीर ड्रोन प्रक्षेपण व ड्रोनचा वापर करण्यास बंदी घालण्यात आली आहे.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर– घुगे यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ (१)(३) नुसार याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत. याबाबतची अधिसूचन निर्गमित करण्यात आली असून हे आदेश ३० एप्रिल २०२४ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत अंमलात राहतील.

# दिल्लीचा मुंबईवर १० धावांनी विजय

मुंबई : अटीतटीच्या सामन्यात दिल्लीने मुंबईचा १० धावांनी पराभव करत दोन गुणांची कमाई केली. दिल्लीने दिलेल्या २५८ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईने नऊ विकेटच्या मोबदल्यात २४७ धावांपर्यंत मजल मारली. मुंबईकडून तिलक वर्मानं एकाकी झुंज दिली. तिलक वर्माने शानदार अर्धशतक ठोकले. रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव आणि ईशान किशन सारखे दिग्गज फेल ठरले. दिल्लीकडून रसिख सलाम याने भेदक मारा करत मुंबईच्या तीन फलंदाजांना तंबूत पाठवले.दिल्लीने दिलेल्या २५८ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईची सुरुवात अतिशय खराब झाली. मुंबईला ६ षटकात फक्त ६५ धावा करता आल्या, पण तीन फलंदाजाना गमावले होते. माजी कर्णधार रोहित शर्मा स्वस्तात तंबूत परतला. रोहित शर्माला फक्त ८ धावा काढता आल्या. ईशान किशन याने १४ चेंडूमध्ये २० धावांची खेळी केली. यामध्ये चार चौकारांचा समावेश होता. तर सूर्यकुमार याद याने १३ चेंडूमध्ये २६ धावा काढल्या. यामध्ये दोन षटकार आणि एका चौकाराचा समावेश होता. दोन्ही संघामध्ये पॉवरप्लेचा फरक स्पष्ट दिसला. दिल्लीने पहिल्या सहा षटकामध्ये ९२ धावा केल्या होत्या, तर मुंबईला ६५ धावाच करता आल्या.

# भारताला विश्व मित्र करण्यासाठी योगदान द्या भाजपा राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे

लातूर/प्रतिनिधी : जागतिक पातळीवर आज भारताचा दबदबा वाढलेला आहे. भारतीय अर्थव्यवस्था वेगाने विकसित होत असून सर्वच बाबतीत जग भारताकडे मोठ्या आशेने पाहात आहेत. वैश्विक पातळीवर जी–२० परिषद जगाचे नेतृत्व करीत असून या परिषेदेचे नेतृत्व करण्याची संधी भारताला मिळाली आहे. या माध्यमातून भारत विश्वाचा सच्च मित्र म्हणून पुढे येत असून त्यासाठी आपण सर्वांनीही योगदान देण्याची आवश्यकता आहे. यासाठी लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना समर्थन व्यक्त करा, असे आवाहन भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी केले.तावडे यांच्या उपस्थितीत शनिवारी सकाळी ११ वाजता दयानंद सभागृहात विकसित भारत २०४७ हा संवाद कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना तावडे बोलत होते. मंचावर लोकसभा संयोजक माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, माजी खा. सुनिल गायकवाड, माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर, शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, ॲड. शैलेश गोजमगुंडे, लातूर शहर विधानसभा प्रमुख गुरुनाथ मगे, राष्ट्रवादीचे ॲड. व्यंकट बेद्रे, सुधीर धुत्तेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी मार्गदर्शन करताना विनोद तावडे म्हणाले की, २०४७ मध्ये देशाच्या स्वातंत्र्याला १०० वर्ष पूर्ण होतील. त्यानिमित्त विकसित भारत २०४७चे व्हिजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ठेवलेले आहे. त्यादृष्टीने कामकाज सुरू आहे. मागील दहा




वर्षात नेमका काय बदल झाला हे देखील तावडे यांनी स्पष्ट केले. २०१४ पर्यंत देशात दररोज केवळ १२ कि.मी. रस्त्यांची निर्मिती होत होती. हे प्रमाण आता २८.६ कि.मी. एवढे आहे. त्याकाळात परकीय गुंतवणूकीत मोठी वाढ झाली. स्वातंत्र्यापासून देशातील १८ हजार ४५२ गावांना वीज मिळाली नव्हती. मोदी सरकारने ही सर्व गावे प्रकाशमान केली. २०१४ पूर्वी २६५० टन एवढे खाद्य उत्पादन होते ते आज ३५०० टन एवढे वाढले असल्याचे तावडे यांनी सांगितले.ते म्हणाले की, मागच्या दहा वर्षात महिलांची कार्यक्षमता व भागिदारीत वाढ झाली आहे. दहा वर्षांपूर्वी केवळ ५ टक्के महिला कंपन्यांच्या संचालक व विश्वस्तपदी होत्या. हे प्रमाण आज २० टक्के आहे.पंतप्रधान आवास योजनेतून सामान्य नागरिकांना घरे मिळाली. या योजनेमुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झाली. देशातील तरुणांसाठी पूर्वी केवळ १६ आयआयटी महाविद्यालये होती. ती आता २३ झाली आहेत. देशातील जनतेच्या आरोग्याची काळजी मोदी सरकारने घेतली असून आयुष्यमान कार्डच्या माध्यमातून सामान्य नागरिकांना आरोग्याच्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. आर्थिक व्यवहार पारदर्शक झाले असून डायरेक्ट बेनिफिटच्या माध्यमातून जनतेने भरलेल्या कररुपी पैशाला योग्य न्याय सरकारने दिला असल्याचे तावडे म्हणाले.तावडे यांनी सांगितले की, पंतप्रधान मोदी यांनी देशातील आर्थिकदृष्ट्या सक्षम व्यक्तींना गॅस सबसिडी सोडण्याचे आवाहन केले. त्यामुळे असंख्य लोकांनी सबसिडी घेणे बंद केले. यातून दुर्बल घटकांना गॅस देता आला. मोफत काही मिळेल या मानसिकतेतून लोकांना बाहेर काढून आर्थिक सक्षम करा, असा संदेश नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. सध्याच्या तरुणाईला देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात योगदान देण्याची संधी मिळाली नाही, पण देशाला विश्वमित्र करण्यासाठी ते योगदान देऊ शकतात. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना समर्थन द्या. लातूर लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना विजयी करा, असे आवाहनही त्यांनी केले. आ. संभाजी पाटील हे लातुरकरांचे चांगले वकील असून त्यांच्या नेतृत्वात या निवडणुकीत महायुतीचा विजय निश्चित असल्याचेही तावडे यांनी सांगितले.यावेळी बोलताना आ. निलंगेकर म्हणाले की, मी स्वतः साठी काही मागितले नाही, पण लातूरकरांसाठी पाणी आणि केंद्रीय विद्यापीठ ही आपली प्रमुख मागणी आहे. आजपर्यंत विरोधी पक्षाने पाण्यासाठी लातुरकरांना झुलवत ठेवले पण पाणी मिळालेच नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी तावडे यांचे ऐकतात त्यामुळे आपण मोदी यांच्याकडे लातुरकरांची वकिली करावी. लातूर येथे आयआयटी महाविद्यालय स्थापन करावे, अशा मागण्याही आ. निलंगेकर यांनी केल्या.कॉँग्रेसमध्ये कार्यकर्त्यांना सन्मान मिळत नसल्यामुळे आपण त्या पक्षाच्या बाहेर पडलो, असे मत ॲड. व्यंकट बेद्रे यांनी यावेळी व्यक्त केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शैलेश गोजमगुंडे तर आभार प्रदर्शन सुधीर धुत्तेकर यांनी केले. या मेळाव्यास डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर, अविनाश कोळी, रागिनीताई यादव, स्मिता परचुरे, प्रेरणा होनराव, अजित पाटील कव्हेकर, डॉ. संजय शिवपुजे, जगदीश कुलकर्णी, सुहास सारडा, अंजली टेंभुर्णीकर,मिना गायकवाड, सुनिल लोहिया, गणेश गोमचाळे यांच्यासह मतदारसंघातील प्रतिष्ठीत नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मंगळवारी लातुरात सभा युवकांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था : पंतप्रधानांना ऐकण्याची लातुरकरांना उत्सुकता : मंडप उभारणीस प्रारंभ

लातूर/प्रतिनिधी : भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी कॉँग्रेस, रिपाई आठवले गट, मनसे, रासप, महायुतीचे लातूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारासाठी देशाचे नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मंगळवार दि. ३० एप्रिल रोजी लातूर येथे जाहीर सभा घेणार आहेत. या सभेची जय्यत तयारी करण्यात येत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जवळून पाहता व ऐकता यावे म्हणून या सभेत युवकांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था केली जाणार असल्याची माहिती लोकसभा संयोजक माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ऐकण्यासाठी जनता नेहमीच आतुर असते. म्हणूनच देशाच्या विविध भागात होणार्या त्यांच्या सभांना उदंड प्रतिसाद लाभत आहे. लाखो लोक सभास्थळी गर्दी करीत आहेत. पंतप्रधान मोदी हे देखील उपस्थितांच्या भावनांची दखल घेत असल्याचे दिसून येत आहे. लातूर लोकसभा मतदारसंघातील भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्यासाठी सभा घेण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. त्यानुसार मंगळवार दि. ३० एप्रिल रोजी दुपारी १२.३० वाजता ही सभा होणार आहे. गरुड चौकातून सारोळा गावाकडे जाणार्या रस्त्यालगत ४० एकरवर ही सभा होणार आहे. यासाठी



अडीच लाख चौरस फूट मंडपाची उभारणी केली जात आहे. मंडप उभारणीच्या कामास सुरूवातही झाली आहे. आ. निलंगेकर व युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर हे सभास्थळाला भेट देवून वारंवार सूचना करीत आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. सभास्थळी आतापासूनच पोलिस बंदोबस्त लावण्यात आला आहे. उन्हाळ्याचे दिवस लक्षात घेता सभेसाठी येणार्या नागरिकांना उन्हाचा त्रास होवू नये याची काळजी आयोजकांच्या वतीने घेतली जात आहे.युवकांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विषयी प्रचंड आकर्षण आहे. ही बाब लक्षात घेता महायुतीच्या वतीने वय वर्ष १८ ते ३५ या वयोगटातील तरुणांना विशेष पास दिले जाणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अगदी समोरच्या भागात तरुणांची बैठक व्यवस्था केली जाणार आहे. यामुळे तरुणांना मोदींचे विचार अधिक चांगल्या पध्दतीने ऐकता येणार आहेत.

देशाच्या विकासासाठी अहोरात्र मेहनत घेणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विचार ऐकण्यासाठी लातूर लोकसभा मतदारसंघातील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी कॉँग्रेस, रिपाई आठवले गट, कवाडे गट, मनसे, रासप, महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक, महिला व तरुणांनी या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहनही आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केले आहे.

# शांतिगिरी महाराज कोट्यधीश

नाशिक : नाशिक लोकसभा मतदारसंघातून नामनिर्देशनपत्र दाखल करणारे अपक्ष उमेदवार व जय बाबाजी भक्त परिवाराचे श्रद्धास्थान शांतीगिरी महाराज यांच्याकडे ३८ कोटी ८१ लाख ५३ हजार ५३३ रुपयांची स्थावर व जंगम मालमत्ता आहे. शांतिगिरी महाराज यांनी प्रतिज्ञापत्रात मालमत्तेचे विवरण दिले असून त्यात नऊ वाहनांसह अनेक ठिकाणी मठ, गुरुकुले, शेतीसारख्या स्थावर मालमत्तांचा समावेश आहे. दिंडोरीचे माकपचे उमेदवार माजी आमदार जे. पी गावित यांच्याकडेही सुमारे चार कोटींची स्थावर व जंगम मालमत्ता आहे. माकपकडूनच अर्ज भरणारे सुभाष चौधरी यांच्याकडे ९२ लाखांची मालमत्ता असून त्यांच्यावर २० लाखांचे कर्ज आहे. वेरुळ मठाचे मठाधिपती शांतिगिरी महाराज नाशिक जिल्ह्यातील लाखलगावचे आहेत. जनार्दन स्वामींचे ते उत्तराधिकारी म्हणून आध्यात्मिक कार्य करीत आहेत. नाशिक लोकसभा निवडणूक लढणार असल्याचे त्यांनी यापूर्वीच जाहीर केले असून, शुक्रवारी (दि. २६) उमेदवारी अर्जही सादर केला.नामनिर्देशनपत्रासोबत जोडलेल्या प्रतिज्ञापत्रातून त्यांनी आपल्याकडील स्थावर व जंगम मालमत्तेचे विवरण सादर केले आहे. लाखलगाव येथील शाळेतून १९७६ मध्ये ते एसएससी परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांच्याकडे ७१ लाख ६८ हजार ६६४ रुपयांची जंगम मालमत्ता आहे. त्यात ६७ लाख ९१ हजार ४८६ रुपये मूल्य असलेल्या सफारी, टेम्पो, पिकअप, दोन स्कूल बस, टाटा ४०७, हायवा, एमयूव्ही, टीयूव्ही यांसारख्या नऊ वाहनांचा समावेश आहे.


# मराठवाड्यातील मतदारांनी मराठवाड्याच्या व देशाच्या विकासासाठी मोदीजींना साथ द्यावी - माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर

लातूर दि.२७–०४–२०२४ देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदी यांनी गेली १० वर्षाच्या शासन काळात जागतिक युध्द, कोरोना महामारी या महाभयंकर संकटामुळे देशाचे प्रचंड मोठे नुकसान झाले यावरती मात करून आज देशाच्या विकासाचा वेग जागतिक स्थरावर गतीने होत आहे. जगातील विविध देशाची गुंतवणूक भारतात सर्वाधिक होत आहे. यामुळे देशातील बेरोजगारी कमी होण्यास मदत होऊन आर्थिक उत्पादन वाढणार आहे. महाराष्ट्रामध्ये मराठवाड्याचा अनुशेष मोठा आहे. पाण्याचा प्रश्न भिषण आहे. या परिस्थितीवर मात करून मराठवाड्याचा व देशाचा विकास साधण्यासाठी नरेंद्र मोदी यांच्या पाठिशी आपली शक्ती उभी करा असे आवाहन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा व गुजरात राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.यावेळी ते मराठवाडा मित्रमंडळ पुणे यांच्यावतीने भारतीय जनता पार्टी, शिंदे गट, राष्ट्रवादी कॉँग्रेस अजितदादा पवार गट, रिपाई आठवले गट, रासप व मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार सुनेत्राताई अजितदादा पवार, शिरूर लोकसभा मतदार संघाचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील, मावळ मतदार संघाचे उमेदवार श्रीरंग आण्णा बारणे यांच्या प्रचारार्थ आयोजित प्रचार बैठकीत बोलत होते.यावेळी या कार्यक्रमाला मराठवाडा मित्रमंडळाचे अध्यक्ष अरूणराव पवार, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस गोरख लोखंडे, प्रकाशराव इंगोले, राठोड, माने आदी उद्योजक व मान्यवर उपस्थित होते.यावेळी पुढे बोलताना माजी आ.कव्हेकर म्हणाले की, या मतदार संघाचा विकास राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली सहकार, शैक्षणिक व उद्योगात अत्यंत गतीने विकास केलेला आहे. पुणे शहर आज आयटी क्षेत्रामध्ये देशात पहिल्या क्रमांकावर आहे. पुणे जिल्ह्याचा विकास अजितदादांनी गतीने केलेला आहे. पुणे पिंपरी मतदार संघामध्ये मराठवाड्यातील लाखो मतदार राहतात. त्यांना मराठवाड्याच्या पुण्याच्या व देशाच्या विकासासाठी मोदीजींना मदत करावी. मोदीजीमुळे जगामध्ये भारताचा सन्मान वाढलेला आहे. जागातील ७८ टक्के जनता मोदीजींना पसंत करीत आहे. त्यामुळे १८ व्या शतकात स्वामी विवेकानंदांनी केलेली भविष्यवाणी खरी ठरून २०४७ मध्ये भारत महासत्ता बनून जगाचे नेतृत्व करेल. असा विश्वासही त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. यावेळी या प्रचार बैठकीला पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# उन्हाळ्यात मधूमेहींनी भरपूर पाणी पिण्याची गरज; शुगर नियंत्रणात नसलेल्यांना डिहायड्रेशनचा धोका जास्त

सोलापूर : बहुतांशी मधुमेह असलेले रुग्ण वयस्कर असतात. सध्या उन्हाचा जोर वाढला आहे. त्यामुळे मधुमेह असणाऱ्यांनी भरपूर पाणी प्यावे. ज्यांची शुगर नियंत्रणात नाही त्यांना डीहायड्रेशनचा धोका जास्त असतो. अशा रुग्णांनी नियमितपणे आपली शुगर तपासणी करून शुगर नियंत्रित ठेवली पाहिजे.मधुमेही रुग्णांनी उन्हाळ्यात शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे. अति महत्त्वाचे काम असल्यास सकाळी ११ च्या आत संपवावे. ज्या ठिकाणी कुलर अथवा थंडाव्याची सोय आहे अशा ठिकाणी वावरावे. उन्हाळ्यात ज्यूस न पिता फळे खाण्यावर जास्त भर द्यावा. साखरयुक्त ज्यूस पिणे टाळावे. रोजच्या जेवणात दही व ताकाचे प्रमाण वाढवावे.मधूमेहाचे प्रकार इन्सुलिन डिपेंडट इन्सुलिन डिपेंडट या प्रकारात अनुवंशिकता हे मुख्य कारण असते. यामध्ये इन्सुलिन रुग्णाच्या शरीरात योग्य प्रमाणात तयार होत नाही. यामध्ये पॅनक्रियाज मध्ये बीटा सेल्स (ग्रंथी) इन्सुलिन तयार करतात. मधुमेहाची अनुवंशिकता पुढच्या पिढीत जाऊ नये यासाठी सध्या कोणतेही उपचार नाहीत परंतु अनुवंशिकतेच्या दोषाच्या प्रमाणावर इन्सुलिन डिपेंडट मधुमेहाचे उपचार ठरतात. इन्सुलिन रेझिस्टन्स इन्सुलिनचे प्रमाण शरीरात योग्य असते. मात्र त्याचा परिणाम प्रभावीपणे होत नाही. अशा प्रकारचा मधूमेह होण्याची प्रमुख कारणे म्हणजे रुग्णाच्या शरीराची जाडी अधिक असणे, व्यायामाची कमतरता, झोप न होणे, अवेळी आहार घेणे, आहारात फास्ट फूडचे जास्त प्रमाण ही प्रमुख कारणे आहेत. या प्रकारच्या रुग्णांनी योग्य काळजी घेतल्यास त्यांना मधुमेहावर पूर्णपणे नियंत्रण करणे शक्य आहे.मधुमेहावर नियंत्रण मिळवण्यासाठी शुगर फ्री चहा, कॉफी घेतली पाहिजे. याबरोबरच डायबेटिक डाएट देखील गरजेचा आहे. गुळ साखर हे पदार्थ पूर्णपणे वर्ज्य केले पाहिजेत. आहारात ज्वारीची भाकरी व भाताचे प्रमाण अत्यल्प असले पाहिजे.फळांमध्ये केळी, आंबा, द्राक्षे खाणे पूर्णपणे टाळायला हवे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सकाळचा नाश्ता व दोन वेळचे जेवण योग्य आहारासह वेळेत घेणे खूप महत्त्वाचे आहे. दररोज कमीत कमी ४५ मिनिटे चालणे हा मधुमेह असणाऱ्या रुग्णांसाठी सर्वोत्तम व्यायाम आहे.– डॉ. मुक्तेश्वर शेटे, मधुमेह तज्ज्ञ, शेटे क्लिनिक गेल्या दहा वर्षांपासून मला मधुमेह आहे. डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे नियमित ४५ मिनिटे चालण्याचा व्यायाम करत आहे. त्यामुळे सध्या मधुमेहावर मला नियंत्रण मिळवता आले आहे. याबरोबरच डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे योग्य आहार वेळेत घेतल्यामुळे तीन वर्षांपासून माझ्या रक्तातील साखरेचे प्रमाण योग्य व नियंत्रणात आहे.– पालाक्षी कारीमुंगी, मधुमेह रुग्ण उन्हाळ्याच्या दिवसात रुग्णांचा आहार कमी झाल्याने शुगर साधारण पातळीपेक्षा खाली येते. त्यामुळे हायपोग्लायसेमियाचा त्रास होऊ शकतो. मधुमेह असणाऱ्यांनी शक्यतो उन्हाचे प्रमाण कमी असताना व्यायाम करावा. व्यायामादरम्यान पाणी प्यावे. उन्हाळ्यात उष्ण जमिनीमुळे मधुमेह असणाऱ्यांच्या पायाला जखम होण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे त्यांनी योग्य बूट अथवा चपला वापराव्यात.



# बुटक्या पुलामुळे पावसाळ्यात संपर्क तुटण्याची शक्यता

## रुई फाटा, गुंडवळ, तांदळा, इंवळेश्वर रस्ता खड्डेमय

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) माहूर तालुक्यात नको त्या ठिकाणी कोट्यावधी रुपयांचे कागदावरील बोगस रस्ते निर्माण करून इतिहास रचला जात असताना अति दुर्गम भागात वसलेले गुडवळ तांदळा ईचळेश्वर या प्रमुख जिल्हा मार्गावर गेल्या दहा वर्षा आधी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून काम करण्यात आले त्यानंतर साधी डागडुजी पण करण्यात आली नसल्याने रस्त्यावर खड्डेच खड्डे निर्माण झाले असून नागरिकांना दहा मिनिटा चे अंतर कापण्यासाठी दोन तास लागत असून या रस्त्यावरील बुटक्या पुलामुळे येणाऱ्या पावसाळ्यात तिन्ही गावाचा संपर्क तुटण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. माहूर तालुका अति दुर्गम डोंगराळ जंगल भागात वसलेला असल्याने देश स्वतंत्र झाल्यापासून अनेक रस्ते पुल दुरुस्ती नूतनीकरणाची वाट पाहत वाहनधारकांसाठी जीव घेणे ठरत आहेत पानोळा ते जुनापाणी या ९५० मीटरच्या रस्त्यासाठी तीन कोटी रुपये खर्च करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्ता जंगलातून गेल्याचे कारण दाखवत



या रस्त्यावर साधे डांबरही टाकले नसल्याने सदरील रस्ता गेल्या अनेक वर्षापासून नागरिकांसाठी जीवघेणा ठरत असून पावसाळ्यात बुटक्या पुलामुळे अनेक वेळा या गावांचा संपर्क तुटलेला असून या रस्त्यावरील मोठमोठे नाले असून परिक्रमा यात्रेत पवित्र मानल्या जाणाऱ्या गरुड गंगेचे पाणी नागरिक प्राशन करण्यासाठी या रस्त्यावरील बुटक्या पुलाजवळ येतात. प्रमुख जिल्हा मार्ग असलेल्या या रस्त्याचे विलीनीकरण करून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे रस्ता वर्ग करण्यात आला सदरील रस्ता शिखर दत्त मांजरी आणि तांदळापर्यंत जोडण्या साठी मंजुरी देण्यात आली परंतु दत्त शिखर पासून दत्त मांजरी आणि तांदळापर्यंत सदरील रस्ता हा वन विभागाच्या हद्दीतून जात असल्याने फक्त या रस्त्याला मंजुरी देण्यात आली असून वनविभागाची परवानगी कधी मिळेल त्याचा पत्ता नाही त्यामुळे रुई फाटा गुंडवळ तांदळा ते ईवळेश्वर रस्त्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याचे रुंदीकरण मजबुतीकरण करून बुटक्या पूलांची उंची वाढविण्याची मागणी रस्त्याच्या त्रासापासून त्रस्त झालेल्या गुंडवळ तांदळा इवळेश्वर या गावातील नागरिक आणि येथे व्यवसायासाठी जाणाऱ्या व्यापारी वगातून होत आहे.

## खा. शृंगारे यांच्या प्रचारात रिपाइं आठवले गट अग्रभागी : सुरेश महाबळे

लोहा/प्रतिनिधी : भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले गट, मनसे, रासप, महायुतीचे लातूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघात रिपाइं आठवले गटाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी प्रचारात आघाडी घेतली असून खा. शृंगारे यांना निवडून आणण्यासाठी ते अग्रभागी काम करीत आहेत, असे प्रतिपादन रिपाइंचे तालुकाध्यक्ष सुरेश महाबळे यांनी केले. रिपाइंचे अध्यक्ष रामदास



आठवले यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्य संघटक विजय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठवाडा उपाध्यक्ष बालाजी धनसरे, तालुका उपाध्यक्ष विश्वनाथ कांबळे, सचिव ॲड. एस. बी. कांबळे, चांदु जाधव, दत्ता ससाणे यांच्यासह रिपाइंचे पदाधिकारी, कार्यकर्ते हे खा. शृंगारे यांच्या प्रचारार्थ कामाला लागले आहेत. लातूर मतदारसंघातून खा. शृंगारे यांचा विजय निश्चित मानला जात असल्याचेही सुरेश महाबळे यांनी सांगितले.

# जिल्हाभरात जलजीवनच्या माध्यमातून चार हजार कोटीची कामे करण्यात आली

## पानगाव येथील जाहीर सभेत खा. सुधाकर शृंगारे यांचे प्रतिपादन

लातूर : - गेल्या पाच वर्षात पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले. खासदाराने काय केले काँग्रेसच्या या आरोपाचा समाचार घेत हर घर नल.... नलसे शुद्ध जल..... या एकाच योजनेच्या माध्यमातून जिल्हाभरात अनेक गावागावात तब्बल चार हजार कोटी रुपयांची कामे केली असल्याचे भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांनी पानगाव येथील जाहीर सभेत बोलून दाखविले.

लातूर लोकसभा निवडणुकीतील प्रचारार्थ रेणापूर तालुक्यातील मौजे पानगाव येथे शुक्रवारी सकाळी जाहीर सभा झाली. या सभेतून खा. शृंगारे बोलत होते. सभेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ मार्गदर्शक व्यंकटराव मामा हे होते तर याप्रसंगी भाजपाच्या नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, युवा नेते ऋषिकेश रमेशआप्पा कराड, जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, शिवसेना युवा जिल्हा प्रमुख कुलदीप सूर्यवंशी, भाजपाचे तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष विनोद आंबेकर, सांगायो समिती अध्यक्ष वसंत करमुडे, भाजपाचे सतीश आंबेकर, प्रदीप कुलकर्णी, दिलीप शेंडगे, अनंत चव्हाण, सुकेश भंडारे, श्रीकृष्ण जाधव, सुंदर घुले, डॉ. हेरकर, मारुती गालफाडे, वामन संपत्ते, महिला आघाडीच्या ललिता




कांबळे, अनुसया फड, शीला आचार्य, रंजना गालफडे, श्रीमंत नागरगोजे, गणेश तूरूप, अमर चव्हाण, मनोहर पाटील, माधव घुले, सुरेश बुड्डे यांच्यासह अनेकांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

यावेळी खा. सुधाकर शृंगारे यांनी केलेल्या विविध विकास कामांची माहिती देऊन खासदाराने काय केले काँग्रेसच्या या आरोपाचा खरपूस समाचार घेताना जल जीवन च्या माध्यमातून जिल्ह्यात ४ हजार कोटीची कामे झाली. ३७ हजार घरे बांधली साडेआठ हजार कोटी रुपये खर्चाचे सिमेंट रस्त्याचे जाळे निर्माण झाले, कोरोनाच्या काळात सामान्यांचा जीव वाचवण्यासाठी १२० व्हेंटिलेटर आणले, दिव्यांगांना ५६ ट्रक साहित्याचे वाटप केले, तब्बल ५८४ प्रश्न सभागृहात विचारले अशी माहिती त्यांनी दिली. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी नरेंद्रजी मोदी दुसऱ्यांदा पंतप्रधान होणे काळाची गरज असल्याचे सांगितले.

डॉ. अर्चनाताई पाटील निलंगेकर म्हणाल्या की, संपूर्ण देशभरातील जनता मोदीजींच्या सोबत असून काँग्रेसकडून अफवा सोडण्याचे अपप्रचार करण्याचे प्रकार होत आहेत अशा खोट्या प्रचारापासून जनतेने सावध राहावे. तुमचा आमचा सर्वांचा सन्मान वाढण्याचे काम करणाऱ्या नरेंद्रजी मोदी साहेब यांना साथ देण्यासाठी सुधाकर शृंगारे यांनाच प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन केले.

रेणापूर, पानगाव परिसर मुंडे साहेबावर प्रेम करणारा असून या भागात प्रत्येक निवडणुकीत कमळच उगवले असल्याचे सांगून भाजपाचे युवा नेते ऋषिकेश दादा कराड यांनी लोकसभेची निवडणूक देशाच्या प्रश्नासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगून ७० वर्षात काँग्रेसला जे जमले नाही ते दहा वर्षात नरेंद्रजी मोदींनी करून दाखविले असे सांगितले.

भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील गावागावात केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी आणला विकास योजना मंजूर केल्या मात्र भाजपा शासनाने मंजूर केलेल्या योजनाचे श्रेय लाटण्याचे प्रकार काँग्रेसवाल्याकडून वेळोवेळी झाले असल्याचे सांगून ऋषिकेश कराड म्हणाले की, ग्रामीण भागाच्या प्रश्नाची काँग्रेसवाल्यांना काहीही घेणं देणं नाही तेव्हा सात तारखेला कमळा समोरील बटन दाबून विकास कामांना गती द्यावी, नरेंद्रजी मोदींना साथ द्यावी आणि सुधाकर शृंगारे यांना आशीर्वाद द्यावेत असे आव्हान केले.

प्रारंभी माजी सरपंच प्रदीप कुलकर्णी यांनी सभेचे प्रास्ताविक केले, भाजपाचे दशरथ सरवदे आणि राष्ट्रवादीचे विनोद आंबेकर यांनी आपले मनोगत व्यक्त करून खासदार सुधाकर शृंगारे यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले. सभेचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी सतीश आंबेकर यांनी आभार मानले. पानगाव येथील जाहीर सभेस पानगाव आणि परिसरातील मतदार बंधू-भगिनी भाजपा व मित्र पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख-दंत रोग टाळण्यासाठी नियमित तपासणी करा

## डॉ. रोहिणी दिवेकर यांचे आवाहन; एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात मुख औषध वैद्यक शास्त्र व क्ष - किरण शास्त्र दिन साजरा

लातूर, दि. २७ - प्रत्येकाला शारीरिक समस्यासोबत मुख - दंत रोगांचा त्रास होऊ शकतो. त्यासाठी नियमितपणे दात व तोंडाची दररोज दोनवेळा स्वच्छता करणे गरजेचे आहे. मुख-दंत रोग होण्यापुर्वी व दंत रोगाची लक्षणे दिसून आल्यास तात्काळ मुख व दातांची दंत वैद्यांकडून तपासणी करून घ्यावी, असे आवाहन मुख औषध वैद्यक शास्त्र व क्ष - किरण शास्त्र तज्ञ डॉ. रोहिणी दिवेकर-शिरोळे यांनी केले.येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील मुख औषध वैद्यक शास्त्र आणि क्ष - किरण शास्त्र विभाग येथे मुख औषध वैद्यक शास्त्र व क्ष - किरण शास्त्र दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. रोहिणी दिवेकर-शिरोळे बोलत होत्या. यावेळी डॉ. अर्चना आपटे, डॉ. स्नेहा जाधवर या उपस्थित होत्या.यावेळी पुढे बोलताना डॉ. रोहिणी दिवेकर-शिरोळे म्हणाल्या की, मानवी मुखाची, दातांची रचना आणि ठेवण ही अत्यंत गुंतागुंतीची असल्याने मुख - दंत रोगाचे निदान करणे क्लिष्ट असते. बहुतेकवेळा तोंडामध्ये व दातात होणारे आजार प्रथमावस्थेत कळून येत नाहीत. यामुळे मुख व दातांचे भरुन न निघणारे नुकसान होते मात्र संबंधीत दंत रोगाची लक्षणे रुग्णांना जाणवत नाहीत. त्यासाठी प्रत्येकाने किमान सहा महिन्यातून एकदा तरी दंत वैद्याकडून तपासणी करून घ्यावी.तोंड व दातांची अस्वच्छता, जंतू संसर्ग, व्यसनाधिनता, अपघात, अपूर्ण झोप, संतुलीत आहाराचा अभाव, जंकफुड, डबाबंद खाद्यपदार्थांचे सेवन, रसायनयुक्त शीतपेयांचा अतिवापर, इतर शारीरीक आजार, बदलती जिवनशैली, चुकीचे पध्दतीने ब्रश करणे आणि प्राथमिक लक्षणांकडे दुर्लक्ष करणे या कारणांमुळे मुख - दंत रोग होतात.मुख व दंत रोग उद्भवल्यानंतर दात व दाढांमध्ये वेदना होणे, दात किडणे व हलणे, दातांची झिज होणे, हिरड्यांना सुज येणे, हिरड्यांमधून पू येणे, पांढरे - लाल चट्टे, तोंडात गाठ तयार होणे, जबड्याचे सांधे, स्नायु दुखणे, तोंडातील जखमा, व्रण येणे, तोंड कमी उघडणे, तोंड बंद न होणे अशी लक्षणे दिसून येतात. अशी लक्षणे दिसून आल्यास दंत वैद्याकडून तपासणी करून आवश्यक उपचार घ्यावेत. त्याचबरोबर पुढील काळात नियमितपणे तपासणी करुन घ्यावी. दंत रोगांच्या लक्षणांकडे दुर्लक्ष



केल्यास दात कायमस्वरूपी गमवावे लागू शकतात, तोंडातील लाल-पांढऱ्या चट्ट्यांचे रूपांतर कर्करोगात होऊ शकते. दंत रोग उद्भवल्यानंतर त्याच्या अचुक निदानासाठी व दातांच्या मुळा खालील किड, हिरड्यांच्या हाडाची झिज पाहण्यासाठी तोंडातील क्ष - किरण ही तपासणी करणे आवश्यक असते. तसेच संपूर्ण दात, जबड्याच्या हाडांची झीज, तुटलेला जबडा, जबड्यांचा सांधा पहाण्यासाठी संपूर्ण दातांची क्ष - किरण तपासणी केली जाते. त्याचबरोबर संपूर्ण चेहऱ्यासाठी उइउढ ही अत्याधुनिक संगणकीकृत तपासणी करुन गुंतागुंतीच्या मुख - दंत रोगांचे अचूक निदान करता येते, असेही डॉ. रोहिणी दिवेकर-शिरोळे यांनी सांगितले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लिपिक राहुल कराड, क्ष - किरण तंत्रज्ञ लक्ष्मण सोनवणे, किशोर मुसळे, परिचारीका पुजा नागरगोजे, उज्वला पवार, सेवक सावित्रा घुले यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास दंत रुग्ण व नातेवाईक उपस्थित होते.

# लातूर जिल्ह्यातील १ हजार ५० मतदान केंद्रांवर राहणार कॅमेऱ्याचा 'वॉच'

## नियंत्रण कक्षातून मतदान केंद्रातील हालचालींवर राहणर लक्ष

लातूर :- लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी लातूर जिल्ह्यात २ हजार १०२ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. यापैकी संवेदनशील केंद्रांसह ५० टक्के मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग यंत्रणा बसवण्यात येणार आहे. त्यामुळे सुमारे १ हजार ५० मतदान केंद्रांवर मतदाना दिवशी सीसीटीव्ही कॅमेऱ्याची नजर राहणार आहे. या माध्यमातून जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, तसेच सहायक सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयातून संनियंत्रण केले जाणार आहे. लातूर जिल्ह्यातील लातूर ग्रामीण, लातूर शहर, अहमदपूर, उदगीर (अ.जा.) आणि औसा विधानसभा मतदारसंघातील वेबकास्टिंगची यंत्रणा लातूर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत राबविली जाणार आहे. जिल्ह्यात एकूण २ हजार १०२ मतदान केंद्र आहेत. यापैकी सुमारे १ हजार ५० मतदान केंद्रावरील कामकाजाचे वेबकॉस्टिंग केले जाणार आहे. वेबकास्टिगची यंत्रणा संवेदीनशील मतदान केंद्रासोबतच आदर्श मतदान केंद्र, सखी मतदान केंद्र, पर्दानशी मतदान केंद्र, दिव्यांग संचलित मतदान केंद्र, पर्यावरणपूरक मतदान केंद्र आणि युवा संचलित मतदान केंद्रावर राहील. तसेच एकाच इमारतीत अथवा परिसरात एकापेक्षा जास्त मतदान केंद्र असलेल्या ठिकाणी, २०१९च्या लोकसभा निवडणूकीत सर्वात कमी मतदान झालेल्या मतदान केंद्रांवरही वेबकास्टिंग केले जाणार आहे. लातूर ग्रमीण मतदार संघातील १८२, लातूर शहर मतदारसंघातील १९२, अहमदपूर मतदार संघातील १८३, उदगीर मतदार संघातील १६८, निलंगा मतदारसंघातील १७२ तसेच औसा मतदारसंघातील १५३ मतदान केंद्रांवर वेबकास्टींगची यंत्रणा कार्यान्वीत करण्यात येणार आहे. वेबकॉस्टिंगसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात सनियंत्रण कक्ष तयार करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम यांच्या मार्गदर्शनात हा कक्ष तयार करण्यात आला असून वेबकास्टींगसाठी पुरणमल लाहोटी तंत्रनिकेतनमधील संगणक विभागाचे विभाग प्रमुख एन.डी.आगावणे यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याच प्रमाणे प्रत्येक सहायक निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातही संबंधित विधानसभा क्षेत्रातील वेबकास्टिंगचे संनियंत्रण केले जाणार आहे. मतदान केंद्रांवर काही अनुसूचित प्रकार निदर्शनास आल्यास अथवा गोपनियतेचा भंग सारखे प्रकार घडल्यास तात्काळ कार्यवाही करणे वेबकॉस्टिंगमुळे सहज शक्य होणार आहे. तसेच मतदान केंद्रावर मतदारांसाठी देण्यात आलेल्या सुविधा पूर्णपणे कार्यान्वीत आहेत का, दिव्यांग मतदारांना व्हिलचेअर उपलब्ध करून दिल्या आहेत का? याकडे जिल्हा व सहायक निवडणूक अधिकाऱ्यांना लक्ष ठेवता येणार आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सभेसाठी शहरात विविध ठिकाणी वाहनतळांची व्यवस्था

सोलापूर : प्रतिनिधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सोमवारी (दि.२९) सकाळी ११ वाजता होम मैदान येथे होणा-या जाहीर सभेसाठी शहरात विविध ठिकाणी वाहनतळांची व्यवस्था करण्यात आली आहे. सभेसाठी येणा-या नागरिकांनी या ठिकाणी दुचाकी आणि चार चाकी वाहने लावावीत असे आवाहन करण्यात आले आहे.या सभेसाठी नागरिकांना होम मैदानामध्ये मार्केट पोलिस चौकी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथूनच प्रवेश दिला जाणार आहे. मंगळवेढा व पंढरपूरकडून तसेच जुना पुणे नाका, तुळजापूर रोडकडून वाहनातून येणा-या नागरिकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी नागरिकांना उतरवून त्यांची वाहने जुनी मिल कंपाऊंड व मरीआई चौक येथील एक्जीबिशन ग्राउंड येथे लावावीत.अक्कलकोटकडून येणारी वाहने नागरिकांना सिव्हील चौक येथे नागरिकांना उतरवून पुंजाल मैदान किंवा नुमवि प्रशाला पाठीमागील मुलांचे शासकीय वस्तीगृह मैदान येथे वाहने लावावीत. होटगी रोड करून येणारी वाहने विजापूर रोड, पत्रकार भवन मोदी पोलीस चौकीमार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे नागरिकांना उतरवून संगमेश्वर महाविद्यालयाजवळील स्काऊट गाईड मैदान किंवा नुमवि प्रशाला पाठीमागील मुलांचे शासकीय वस्तीगृह मैदान येथे वाहने लावावीत. तसेच नॉर्थकोट मैदान व हुतात्मा स्मृती मंदिर येथे दुचाकी वाहने लावता येतील, असे प्रशासनाने कळवले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE